राज्यातील सार्वजनिक सार्वजनिक आरोग्य विभागातील वरीष्ठ अधिकाऱ्यसाठी (Leaders) नेतृत्व विकास कार्यक्रम आयोजित करण्यासाठी “हाय प्लेसेस मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड (High Places Management Pvt. Ltd.)”, गरूडमाची, पुणे या संस्थेबरोबर सामंजस्य करार करणे व त्याअनुषंगाने प्रशिक्षण सत्रासाठी येणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेबाबत...

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण-२०२६/प्र.क्र. ८० /क्षमता बांधणी ई क्र. १६३६२४०
गो.ते.रुग्णालय संकुल, दहावा मजला, संकुल इमारत
मंत्रालय, मुंबई ४००००१
दिनांक : ०९ जुलै,२०२६.

वाचा :- हाय प्लेसेस मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड' (High Places Management Pvt. Ltd.), गरूडमाची, पुणे यांचे पत्र, दि. २०.०४.२०२६.

प्रस्तावना :-

राज्यातील आरोग्य विषयक सेवा वृध्दींगत करण्यासाठी आरोग्य व्यवस्थेतील वैद्यकीय अधिकारी (Leaders) नेतृत्व विकास कार्यक्रम आयोजित करणे इत्यादीसाठी हाय प्लेसेस मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड' (High Places Management Pvt. Ltd.), गरूडमाची, पुणे या संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणसाठी या संस्थेबरोबर वित्तीय सामंजस्य करार Financial Memorandum of Understanding (MoU) करार करण्यास तसेच सदर संस्था प्रथम ६ प्रशिक्षण सत्रे अयोजित करणार आहे त्यासाठी प्रति प्रति २० प्रशिक्षणार्थी करीता रू. ₹५,७७,९४०/- (जीएसटी सह)./- (अक्षरी रूपये पाच लक्ष सत्याहत्तर हजार नऊशे चाळीस फक्त) एक सत्र याप्रमाणे एकूण ६ प्रशिक्षण सत्रासाठी एकूण रू. ₹३४,६७,६४०/-. (अक्षरी रू. चौतीस लक्ष सदुसष्ट हजार सहाशे चाळीस फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

राज्यातील आरोग्य विषयक सेवा वृध्दींगत करण्यासाठी आरोग्य व्यवस्थेतील वैद्यकीय अधिकारी (Leaders) नेतृत्व विकास कार्यक्रम आयोजित करणे इत्यादीसाठी हाय प्लेसेस मॅनेजमेंट प्रायव्हेट लिमिटेड' (High Places Management Pvt. Ltd.), गरूडमाची, पुणे या संस्थेमार्फत

राबविण्यात येणाऱ्या प्रशिक्षणसाठी या संस्थेबरोबर वित्तीय सामंजस्य करार Financial Memorandum of Understanding (MoU) करार करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. तसेच सदर सदर संस्था प्रथम ६ प्रशिक्षण सत्रे अयोजित करणार आहे त्यासाठी प्रति २० प्रशिक्षणार्थी करीता रू. ₹५,७७,९४०/- (जीएसटी सह)./- (अक्षरी रूपये पाच लक्ष सत्याहत्तर नऊशे चाळीस फक्त) एक सत्र याप्रमाणे एकूण ६ प्रशिक्षण सत्रासाठी एकूण रू. ₹३४,६७,६४०/- (अक्षरी रू. चौतीस लक्ष सदुसष्ट हजार सहाशे चाळीस फक्त) इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च हा मुख्य लेखाशिर्ष २२११०१०२ कुटुंब कल्याण,००३ प्रशिक्षण (०१) कुटुंब कल्याण प्रशिक्षण (०१) (०१) प्रादेशिक कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्रे (१०० टक्के केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम), १३-कार्यालयीन खर्च या उद्दिष्टाखाली सन २०२६-२७ करीता मंजूर असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

३. हे आदेश, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७५ मध्ये दि १७.०४.२०१५ मधील उपविभाग क्र . ४ मधील अ .क्र .१०, नियम क्र १० अन्वये, प्रशासकीय विभाग प्रमुखांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे .

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२६०७०९११४२१९५८१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ARVIND BHIMRAO MORE

Digitally signed by ARVIND BHIMRAO MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=203AF2DFBA7DB2A4824298A34F2C9294F93396F53D7F87CD4D69FECF5CF7005F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9246B8CCD2E2CB10707678D45EA1AD26CC1E4D7BFF7BD2AA1F253A716B8C448B, cn=ARVIND BHIMRAO MORE
Date: 2026.07.09 17:50:30 +05'30'

(अ.भि.मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र- १/२, मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक १/२), आरोग्य सेवा, मुंबई/पुणे.
४. उप संचालक, आरोग्य सेवा, नागपूर

५. संचालक,राज्य आरोग्य व कुटुंब कल्याण संस्था,नागपूर
६. डॉ. सुहास कोरे प्राचार्य, जिल्हा प्रशिक्षण केंद्र, पुणे
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर,
८. निवडनस्ती (क्षमता बांधणी).